


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : ३३२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१३ जुलै २०२५

## लिंबू, बाहुली, कागद शेजाऱ्यांच्या घरासमोर ठेवले! नागपुरात अघोरी प्रकारानं खळबळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नागपूर :** भीती दाखविण्यासाठी शेजाऱ्याच्या घरासमोर काळ्या रंगाची बाहुली, हिरवी मिरची व लिंबू ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार नवीन कामठी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील लिहिगाव येथे घडला. याप्रकरणी पोलिसांनी दोघांविरूद्ध जादुटोणा प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. गजानन चैतराम उईके (वय ४१, लिहिगाव) व त्यांचा साथीदार प्रवीण हेमचंद मेश्राम(रा. गुमथाळा) ,अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. अभिषेक संजय ठाकरे (२५) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला.



पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, संजय व उईके यांची शेती आहे. संजय यांचा दुधाचाही व्यवसाय आहे. संजय व उईके हे शेजारी राहतात. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या विहिरीवरून वाद सुरू आहे. जानेवारी महिन्यांत हे प्रकरणा पोलिस ठाण्यात गेले. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. १० जुलैला मध्यरात्री संजय यांच्या घरासमोर काळी बाहुली, लिंबू ,मिरची व कागद ठेवण्यात आला. कागदावर संजय व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावे लिहिली आहेत. सकाळी संजय यांना हे साहित्य घरासमोर दिसले. संजय यांनी पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती दिली.

नियंत्रण कक्षाने नवीन कामठी पोलिसांना कळविले. माहिती मिळताच पोलिस तेथे पोहोचले. पोलिसांनी संजय यांच्या घरातील सीसीटीव्ही फ ुटेज तपासले. यावेळी उईके व प्रवीण हे दोघे हे साहित्य ठेवत असल्याचे दिसले. पोलिसांनी सीसीटीव्हीचा डिव्हिआर जप्त केला. संजय यांनी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

अलीकडेच यवतमाळ येथील एक अघोरी प्रकार समोर आला होता. म हादेव परशुराम पालवे उर्फ माउली या मांत्रिकाकडे दिग्रस येथील नीतू जयस्वाल या उपचारासाठी येत होत्या. त्यांच्यासोबत त्यांची १४ वर्षांची मुलगीही येत होती. उपचाराच्या नावाखाली मांत्रिकाने पूर्जाअर्चा करून त्या दोघांना संमोहित केले. यानंतर त्या मायलेकी मांत्रिकाच्या घरीच राहू लागल्या. नंतर मुलीलाही बाधा झाल्याचे सांगून त्याने तिच्यावरही अघोरी उपचार सुरू केले.

तो तिला उपचाराच्या नावाखाली चटके देत होता. बाहेरची शक्ती तिच्या शरीरात असल्याचे सांगत बेदम म ारहाणही करायचा. जेवण बंद असल्याने दोघीही अशक्त झाल्या. मांत्रिकाकडे काहीतरी भयंकर कृत्य होत असल्याचा शेजाऱ्यांना संशय आला. त्यांनी याची माहिती पोलिसांना दिली. ठाणेदार राम कृष्ण जाधव यांनी पथकासह मांत्रिकाच्या घरावर धाड टाकत नीतू यांच्यासह त्यांच्या मुलीची सुटका केली.

## आषाढी वारीत १०८ रुग्णवाहिका वारकऱ्यांसाठी ठरली जीवनदायी

### १६ हजार ७१६ रुग्णांना १०८ या मोफत रुग्णवाहिकेने पुरविली सेवा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** आषाढी यात्रा कालावधीमध्ये वारकरी भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी डायल १०८ च्या एकूण १२० रुग्णवाहिका कार्यरत होत्या. त्यासाठी ईओसी (कंट्रोल रुम) कक्ष तयार करण्यात आले होते.



त्याव्दारे पंढरपूरातील सर्व भाविकांना २४ तास मोफत सेवा दिली गेली. यात्रा कालावधीत गर्दी मोठ्या प्रमाणात असल्याने मोबाईल नेटवर्कला अडथळे वारंवार येत असल्यामुळे या वर्षी सेवा लवकरात लवकर मिळावी, यासाठी वॉकीटॉकीची सुविधा सर्व रुग्णवाहिकाम ध्ये उपलब्ध करुन देण्यात आली होती. पंढरपूरात अद्यावत असणारी कंट्रोल रुम वॉकीटॉकी सुविधा, जिओ मॅपींग या सर्व गोष्टीमुळे १०८ रुग्णवाहिका वारकऱ्यांसाठी जीवनदायी ठरली. आषाढी यात्रेत यावर्षी गंभीर स्वरुपाच्या १२४० रुग्णांना व किरकोळ आजार असणाऱ्या १५ हजार ४७६ रुग्णांना सेवा देण्यात आली. एकूण १६ हजार ७१६ रुग्णांनी १०८ या मोफत रुग्णवाहिका सेवा देण्यात आली.

आषाढी यात्रेचा सांगता समारोप दिनांक ११ जुलै २०२५ रोजी प्रांताधिकारी कार्यालय येथे करण्यात आला. वारीमध्ये काम करणाऱ्या सर्व डॉक्टर व पायलट व कंट्रोल रुममधील सर्व कर्मचाऱ्यांच्या प्रशासनाकडून यथोचित सन्मान करण्यात आला.

या समारंभास प्रांताधिकारी सचिन इथापे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. दीपक धोत्रे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, आय.सी. यु इन्चार्ज डॉ.महेश सुडके, डॉ. प्रसन्न भातलवंडे, पुणे विभाग प्रतिनिधी - डॉ. प्रियांक जावळे, सातारा जिल्हा व्यवस्थापक राजेंद्र कदम, सांगली जिल्हा व्यवस्थापक कौस्तुभघाटुळे, सोलापूर जिल्हा व्यवस्थापक अनिल काळे, तसेच सर्व एडीएम, इएमइसओ (डॉक्टर), पायलट कार्यक्रमास उपस्थित होते.

## उद्या हॉटेल आणि बार व्यवसायिकांचा महाराष्ट्र बंद



### खायचे आणि बसायचे होणार वांदे...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१२, ठाणे :** दोनच दिवसांपूर्वी देशभरातील १० केंद्रीय कामगार संघटनांनी 'भारत बंद'ची हाक दिली होती, आणि आता त्यानंतर येत्या १४ जुलैला 'म्हणजेच सोमवारी महाराष्ट्र बंद'ची हाक देण्यात आली आहे. हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनने१४ जुलैला ही महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. राज्य सरकारच्या अन्यायकारक कर धोरणांविरूद्ध असोसिएशन ऑफ हॉटेल्स अँड रेस्टरंट म्हणजेच 'आहार' संघटनेने हा एल्गार पुकारला आहे.

त्यामुळे येत्या सोमवारी राज्यभरातील हॉटेल, रेस्टॉरंट, परमिट रूम आणि बार बंद राहणार आहेत. यामुळे राज्याच्या महसुलावर याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. आहार संघटनेच्या वतीने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर 'महाराष्ट्र बंद' बाबत पोस्ट केली आहे. या पोस्टच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्र बंदचे कारण सांगितले आहे. १४ जुलै २०२५ रोजी राज्यव्यापी बंद! अन्याय्यकारक कराच्या बोज्याविरोधात महाराष्ट्रातील परमिट रूम आणि बार बंदच राहणार आहेत. हॉस्पिटॅलिटी उद्योग आपला आवाज सर्वांसमोर मांडत आहे! सोमवार, १४ जुलै २०२५ रोजी, महाराष्ट्रातील सर्व परमिट रूम आणि बार आमच्या उद्योगावर लादलेल्या अन्याय्य आणि प्रचंड करवाढीच्या निषेधार्थ संपूर्ण बंद पाळतील.दारूवरील व्हॅट दुपटीने वाढ करण्यात आली. परवाना शुल्क १५ टक्के वाढवण्यात आले. उत्पादन शुल्कात ६० टक्केची मोठी वाढ करण्यात आली.

राज्य सरकारच्या या तीव्र बदलांम ुळे असंख्य लहान आणि मध्यम उद्योगांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. ज्यामुळे हजारो लोकांच्या नोकऱ्या आणि उपजीविका धोक्यात आली आहे. हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडिया कडून निष्पक्ष धोरणांची मागणी करण्यासाठी आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्राचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी ही बंदची हाक देण्यात आली आहे. आम्ही सर्व उद्योग भागधारकांना एकत्र येऊन म जबूत राहण्याचे आवाहन करतो.

चला आपण एक स्पष्ट संदेश देऊया - आता पुरे झाले! असेही या संघटनेने म्हटले आहे. राज्य सरकारच्या अन्यायकारक कर धोरणाविरोधात इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन अर्थात 'आहार' संघटनेने १४ जुलै रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. ही आमच्या अस्तित्वाची लढाई आहे, असे स्पष्ट शब्दांत सांगत संघटनेने आपली भूमि का मांडली आहे.

दरम्यान या आंदोलनांतर्गत राज्यभरातील २० हजार हून अधिक हॉटेल व रेस्टॉरंट मालकांनी सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. बंदचा सर्वाधिक प्रभाव मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर यांसह राज्यातील प्रमुख शहरी भागांमध्ये जाणवणार आहे. सोमवारी राज्यातील सर्व परमिट रूम्स, बार, हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्स पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. हा बंद पूर्णतः शांततेत पार पडणार असल्याचे संघटनेकडून सांगण्यात आले आहे.मात्र, सरकारने जर याकडे दुर्लक्ष केले, तर पुढील काळात तीव्र आणि उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा ही संघटनेने दिला आहे.

## थोडक्यात

### मंद्रूपमध्ये युवकावर धारदार शस्त्राने हल्ला!

#### अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मंद्रूप (सोलापूर) :** माझ्या बहिणीशी फोनवरून का बोलतो म्हणून एका तरुणांवर धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना मंद्रुप येथे घडली. याप्रकरणी एका विरुद्ध गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याबद्दल मंद्रुप पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सिद्धाराम मधुकर ख्याडे राहणार मंद्रूप (तालुका दक्षिण सोलापूर) असे गंभीर जखमी तरुणाचे नाव आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, मंद्रूप-टाकळी रस्त्याने सिद्धाराम ख्याडे हा मोटारसायकलवरून केलेल्या शेताकडे गुरुवारी (१० जुलै) रोजी रात्री अकरा वाजता निघाला होता. सातापा म्हेत्रे यांच्या शेताजवळ तो आल्यानंतर मारेकर्यांनी त्याला अडवले. तो आमच्या बहिणीशी फोनवरून का बोलतो. तुला सोडणार नाही असे म्हणत मारू लागले. तेव्हा संशयित आरोपी यांनी त्याच्या जवळील धारदार शस्त्राने डोक्याच्या पाठीमागील बाजूला व खांद्यावर वार करून गंभीर जखमी केले. तेव्हा जखमी ख्याडे यांनी आरडाओरडा केल्याने ते पळून गेले. हा गोंधळ ऐकून जवळील वस्तीवरील लोक धावत आले. त्यांनी ओळखून जखमी ख्याडे यांच्या भावास याची माहिती दिली. त्यानंतर त्याला गंभीर जखमी अवस्थेत रुग्णवाहिकेतून सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.



दरम्यान त्याचा भाऊ मळसिद्ध ख्याडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एका तरुणाविरुद्ध मंद्रुप पोलीस ठाण्यात गंभीर जखमी करून खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पीएसआय राजकुमार डांगे करीत आहेत.

### वरोरा येथील घरफोडीचा गुन्हा १२ तासाचे आत उघड

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२ वरोरा (चंद्रपूर) :** दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर चे पथक वरोरा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन रेकॉर्डवरील गुन्हेगार (१) अनिल उर्फ कुंभकर्ण येलज्जी लोणारे वय ३० वर्ष रा. कर्मवीर वार्ड वरोरा, (२) अरविंद उर्फ कावळा नामदेव सातपुते वय ३८ वर्ष रा. कर्मवीर वार्ड वरोरा (३) रंगा शंकर चिंतलवार वय ५५ वर्ष रा. फिरस्ता यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडे विचारपुस केली असता त्यांनी



पोलीस स्टेशन वरोरा अपराध क्रमांक ४२९/२०२५ कलम ३०५ (अ), ३३१ (४) भारतीय न्याय संहिता हा घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यांचे कडुन सदर गुन्हयात चोरलेले सोन्या-चांदीचे दागीने हस्तगत करण्यात आले असुन आरोपींना वरोरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास वरोरा पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सपोनि बलराम झाडोकर, पोउपनि संतोष निभोरकर, पोउपनि सर्वेश बेलसरे, सफौ धनराज करकाडे, पोहवा अजय बागेसर, सचिन गुरनुले, चेतन गज्जलवार, पोअं किशोर वाकाटे, गणेश भोयर, प्रमोद कोटनाके, गोपीनाथ नरोटे, चापोअं वृषभ बारसिंगे व मिलीट टेकाम सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.

### पाटणच्या मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यावर पडले खड्डे

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१२, पाटण :** पाटण शहरातील मुख्य बाजारपेठेत बालाजी मोबाईल शॉपी समोर मोठा खड्डा पडला आहे. हा खड्डा दिवसे दिवस मोठा होत आहे. पाटण शहरातील मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यावरून रोज वाहनांचची हजारोच्या संख्येने ये जा करत असतात. पाटणच्या मुख्य बाजारपेठेतूनच शाळा महाविद्यालय पाटण तालुक्यातील विविध शासकीय कार्यालय आहेत. त्यामुळे ह्या रस्त्यावर रोज मोठी वाहनांची वर्दळ होत असते. पाटण नगरपंचायतीने हा मोठा खड्डा तातडीने भरून घ्यावा. ह्या खड्ड्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहनधारकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे या पाटणच्या मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ होत असते. हा मोठा खड्डा चुकवताना अनेक वाहनधारकांचा खड्ड्याला चुकवण्याच्या नादात अपघात झाले आहेत आणि वादावादीचे प्रसंग उद्भवत आहेत. त्यामुळे पाटण नगरपंचायतीने तातडीने हा मोठा खड्डा पडलेला बुजवून घ्यावा अशी वाहनधारकांची मागणी होत आहे. पाटणच्या मुख्य बाजारपेठेत नळाच्या पाईप लाईन मध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे अनेक ठिकाणी रस्ता खोदून ठेवला जातो. त्यामुळे तो खड्डा परत व्यवस्थित बुजवला जात नाही त्यामुळे खड्डे तसेच राहत आहेत. त्याच खड्ड्याचा वांधारकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. तर दुचाकी स्वार या खड्ड्यात पडून जखमी झाले आहेत. ह्या मोठ्या खड्ड्यामध्ये खड्ड्यात वाहने आदळून मोठा आवाज वाहनांचा येत आहे आणि वाहनांचे मोठे नुकसान होत आहे. तर हा खड्डा नगरपंचायतीने तातडीने बुजवावा अशी वाहनधारकांची मागणी होत आहे.



# आमदार दाते यांनी विधानसभेत मांडले शेतकऱ्यांचे प्रश्न

## बोगस बियाणे विक्रेते व दलाल यांच्यावर कठोर शासन करण्याची मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, पारनेर (अहिल्यानगर) :** आमदार काशिनाथ दाते यांनी शेतकऱ्यांच्या न्यायासाठी विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे भक्कमपणे भूमिका मांडली. त्यांनी यावेळी पारनेर मतदार संघातील बाजरीचे बोगस बियाणे, बोगस कांदा बी विकणारे दलाल, यामुळे झालेले नुकसान, शेतकऱ्यांसाठी हमीभाव याबाबत त्यांनी आवाज उठवला. तसेच शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर शासन करा अशी मागणी केली.



पारनेर तालुक्यातील सर्वच गावांसह वासुंदे, वडगाव सावताळ, टाकळी ढोकेश्वर, कासारे, कर्जुले हर्या, तिखोल काकणेवाडी, गारगुंडी व इतरही भोवतालच्या गावांतील शेतकऱ्यांनी मे महिन्याच्या मध्यात झालेल्या अवकाळी पावसानंतर मोठ्या आशेने खरीप हंगामासाठी बाजरीची पेरणी केली. मात्र बाजारातून विकत घेतलेले बियाणे बोगस असल्याचे निष्पन्न झाले. उगवणी न झाल्याने दुबार पेरणीची वेळ आली.

अगोदरच अवकाळी पावसामुळे या भागातील शेतकरी संकटात सापडला होता त्यात बाजरी पेरणीसाठी पैसे, वेळ व मेहनत वाया गेली. त्यांच्या कष्टांवर, त्यांच्या आशांवर अक्षरशः पाणी फिरले. या प्रकाराने शेतकऱ्यांचे केवळ आर्थिक नुकसानच झाले नाही, तर मानसिक ताण वाढवणारी निराशा त्यांच्या आयुष्यात अवतरल्याचे दिसत आहे. या भागातील शेतकऱ्यांनी सबंधित प्रकरणी प्रशासनाकडे तक्रार करत झालेल्या नुकसानीच्या भरपाईची मागणीही केली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, याच भागात कांदा बियाणे विक्री करणारे बोगस दलाल मोठ्या प्रमाणात सक्रीय झाले असून ते चढ्या भावाने कांदा बियाण्याची विक्री करून शेतकऱ्यांची लुट करत आहेत. ह्या प्रकाराला पायबंद घालण्यासाठी बियाण्याची चढ्या भावाने विक्री करणारे दलाल व बोगस बाजरी बियाणे बाजारात आणणाऱ्या कंपन्या, वितरक यांच्यावर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी, अशी ठाम भूमिका मांडली. शेतकऱ्यांचे कष्ट वाया जाता कामा नये, त्यांच्या कष्टाला मोल पाहिजे या भावनेतून त्यांनी घेतलेल्या ठाम भूमिकेमुळे विधानसभेत लक्षवेधी ने सर्वांचे लक्ष वेधले गेले.

# बल्लारपूर येथे स्वतंत्र रेल्वे पोलिस ठाणे करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## मुख्यमंत्र्यांनी दिल्या बल्लारपूर येथे स्वतंत्र जीआरपी पोलिस ठाणे करण्याच्या सूचना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, बल्लारपूर (चंद्रपूर) :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारशाह रेल्वे स्थानकावरील प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. बल्लारशाह रेल्वे स्टेशनवर रेल्वे पोलिस दूरक्षेत्र चौकीचे स्वतंत्र पोलिस ठाण्यात रूपांतर करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या माध्यमातून आ. मुनगंटीवार यांनी प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दा शासन दरबारी ठामपणे मांडत आवश्यक निर्णय घेण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात सदस्य रेल्वे उपभोगता सल्लागार समिती (झेड.आर.युसीसी) मध्य रेल्वे मुंबईचे अजय दुबे यांनी हा विषय आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या निदर्शनास आणून दिला होता.

या विषयाची गांभीर्याने दखल घेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन, बल्लारशाह रेल्वे स्टेशनवरील रेल्वे पोलिस दूरक्षेत्र चौकीचे स्वतंत्र पोलिस ठाण्यात रूपांतर करण्याची लेखी विनंती सादर केली.



या निवेदनात त्यांनी नमूद केले की, बल्लारशाह हे महाराष्ट्र व तेलंगणाच्या सीमेवरील एक अत्यंत महत्त्वाचे रेल्वे स्थानक असून येथे दररोज ३ हजार हून अधिक प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. सध्या येथे केवळ जीआरपीची आऊट पोस्ट कार्यरत असून तिची कार्यक्षमता अत्यंत मर्यादित आहे. या ठिकाणी जवळचे जीआरपी स्टेशन वर्धा येथे आहे. ते तब्बल १२० किमी अंतरावर आहे. वर्धा जीआरपीचे कार्यक्षेत्र राजुरा आणि यवतमाळपर्यंत पसरले असून, एकूण १९ रेल्वे स्थानके यामध्ये समाविष्ट आहेत. रेल्वे स्टेशनवर गंभीर घटनांचे प्रमाण वाढत असताना, स्वतंत्र पोलिस स्टेशन नसल्यामुळे तपास प्रक्रिया, प्रवाशांच्या मदतीसाठीची तत्परता आणि एकूणच कायदा-सुव्यवस्था यावर परिणाम करणारी ठरत आहे. त्यामुळे स्वतंत्र जीआरपी पोलिस ठाण्याची आवश्यकता असल्याचे आमदार मुनगंटीवार यांनी अधोरेखित केले. आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत तात्काळ स्वतंत्र जीआरपी पोलिस ठाणे करण्यासंदर्भातील सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# 'महास्ट्राईड' जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढवणार

## 31 महत्वकांक्षी प्रकल्पांवर भर - आ.राणाजगजितसिंह पाटील

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.११, धाराशिव :** 'मित्र' संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकार आणि जागतिक बँकेच्या सहकार्याने 'MahaSTRIDE' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या अंतर्गत धाराशिव जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलणाऱ्या महत्वाकांक्षी प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी नुकतीच एक महत्त्वाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीत District Strategy Plan ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. 'MahaSTRIDE' या प्रकल्पाचा उद्देश हा प्रत्येक जिल्ह्याच्या स्थानिक गरजा आणि बलस्थान लक्षात घेऊन विशेष विकास आराखडे तयार करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, असा आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्यांच्या विकासाला दिशा मिळेल आणि महाराष्ट्राच्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीत प्रत्येक जिल्ह्याचा सक्रिय सहभाग सुनिश्चित होईल.

महास्ट्राइड (MahaSTRIDE) प्रकल्पाच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला गती देणाऱ्या ३१ प्रकल्पांवर भर देण्याचे ठरले आहे. जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न हे रू.१,९०,३८३ असून सकल राज्यांतर्गत उत्पन्नात जिल्ह्याचा वाटा १% आहे. २०२७ पर्यंत तो तेव्हाच्या उत्पन्नाच्या १.२ टक्के करण्याचे उद्दीष्ट असुन देशाच्या व राज्याच्या विकासासोबतच जिल्हा देखील मागे रहायला नको यासाठी प्रभावीपणे काम सुरू असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष तथा आ. राणाजगजितसिंह पाटील साहेब यांनी दिली आहे.



प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने 'मित्र' संस्थेच्या माध्यमातून सल्लागार नेमण्यात आला असुन प्रत्येक जिल्ह्यात ४ तज्ञ व्यक्तींची नेमणुक करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी सकारात्मकतेने सहभागी होत काम करणे आवश्यक आहे. राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजना व ३१ महत्वकांक्षी प्रकल्पांच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान व दरडोई उत्पन्न वाढविण्यास नक्कीच मदत होणार आहे. 'MahaSTRIDE' या प्रकल्पामुळे जिल्ह्यांच्या अर्थकारणाला मोठी गती मिळेल आणि महाराष्ट्राच्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीत आपल्या सर्वांच्या सहकार्याने व सहयोगाने जिल्ह्याचा सन २०२२ मध्ये ४.४ बिलीयन डॉलरचा (अंदाजे रू.३८,२६४ कोटी) सहभाग सन २०२७ पर्यंत १३.१४ बिलीयन डॉलर (रू. १,१४,२७० कोटी अंदाजित) पर्यंत सुनिश्चित होईल, असा विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

# ओबीसींच्या लढ्याला बळकटी देण्यासाठी संघटनेचे कार्य - खासदार भुजबळ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील दक्षिण भागातील पाथर्डी, शेवगाव, श्रीगोंदा, नगर, पारनेर, कर्जत-जामखेड यांसह उत्तर भागातील राहुरी, श्रीरामपूर, संगमनेर, कोपरगाव, राहता, भाबळेश्वर या तालुक्यातील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत आज शनिवार, दि.१२ जुलै २०२५ रोजी 'संवाद आढावा बैठक' नगर शहरात शासकीय विश्रामगृह येथे समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत उपस्थित पदाधिकाऱ्यांशी विविध विषयांवर सखोल संवाद साधत, संघटनेच्या भविष्यातील वाटचालीबाबत मते जाणून घेतली. ओबीसी समाजाच्या हक्कांच्या लढ्याला अधिक बळकटी देण्यासाठी व संघटनेचे कार्य अधिक सर्वसामान्यांपर्यंत




पोहोचविण्यासाठी प्रत्येक समता सैनिकाने जबाबदारीने आणि झोकून देऊन काम करण्याच्या सूचना दिल्या. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यपद्धती, संघटनात्मक सद्यस्थिती आणि आगामी दिशा यावर विचारमंथन झाले. ओबीसी आरक्षण, हक्कांचे संरक्षण आणि प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे, असे यावेळी समीर भुजबळ यांनी आवर्जून अधोरेखित केले. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ,बापूसाहेब भुजबळ, प्रदेश प्रचारक डॉ.नागेश गवळी, प्रा.संतोष विरकर, अंबादास गारुडकर, सुभाष लोंढे, प्रशांत शिंदे, अण्णासाहेब शेलार, बाळासाहेब बोराटे, जालिंदर बोरुडे, वसंत रांधवण,बंडू कोथिंबीरे, खंडू भुकन, किसनराव रासकर,अनिल निकम, संजय डाके अर्जून मेहेत्रे, बबनराव घुमटकर, नवनाथ खामकर, रोहित पुंड, नवनाथ वाकळे, सुरेश थोरात, नानाभाऊ गाडीलकर, सुवर्णा धाडगे, गोरख आळेकर, प्रयाग लोंढे, धनंजय डहाळे, कल्याण अनारसे, रामदास हजारे, शरद मेहेत्रे यांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील समता परिषदेचे पदाधिकारी, समर्पित समता परिषदेचे कार्यकर्ते आणि महिला भगिनी उपस्थित होत्या.

## थोडक्यात

### तुळजाभवानी स्टेडियमवर अकॅडमीच्या गर्दीमुळे सर्वसामान्यांना व्यायामात अडथळा

**अक्षराज : विश्वास नायगांवकर**

**दि.११, तुळजापूर (धाराशिव) :** शहरातील एकमेव तुळजाभवानी स्टेडियममध्ये विविध खासगी अकॅडमींच्या वर्गांनी व्यायामाच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर जागा व्यापल्याने सर्वसामान्य नागरिकांना सकाळ-संध्याकाळच्या वेळेत कसरत करणे अवघड झाले आहे.



विशेषतः धावपटू, जेष्ठ नागरिक आणि महिला व्यायामासाठी स्टेडियममध्ये येत असतात. मात्र अकॅडमीचे खेळाडू आणि प्रशिक्षण वर्गांच्या गर्दीमुळे स्टेडियममध्ये मोकळ्या जागेचा अभाव भासत असून अनेकांना अपघाताचा धोका निर्माण होत आहे. स्थानिक नागरिकांनी याविरोधात नाराजी व्यक्त करत प्रशासनाकडे तक्रार करण्याचा इशारा दिला आहे. हे स्टेडियम केवळ खासगी अकॅडमीसाठी नव्हे, तर सर्वांसाठी आहे. सार्वजनिक सुविधा सर्व नागरिकांसाठी खुल्या असाव्यात, अशी मागणी होत आहे. स्थानिक प्रशासन आणि क्रीडा विभागाने याकडे तातडीने लक्ष देऊन सर्वसामान्य नागरिकांसाठी स्वतंत्र वेळ किंवा जागा राखून द्यावी, अशी मागणी स्टेडियम वापरणाऱ्या नागरिकांतून होत आहे.

### श्रीमंत शिवाजीराजे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून पाडळी शाळेत वृक्षारोपण

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१२, खंडाळा (सातारा) :** द फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय फलटणच्या ७ व्या सत्रातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रम (ठक्थए) अंतर्गत पाडळी गावात विविध उपक्रम राबवले. या उपक्रमाचा एक भाग म्हणून पाडळी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे हरिभाऊ माने (माजी सरपंच) यांनी उद्घाटन केले आणि उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत वृक्षारोपणाचे व पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करणारे भाषण केले. कार्यक्रमानंतर हरीभाऊ माने (माजी सरपंच) यांनी स्वतःच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला.त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.



यावेळी शाळेचे मुख्याध्यापक हनमंत धायगुडे, शिक्षक कृष्णा रासकर, विशाल गिरी, सुनील हाडंबर तसेच शिक्षिका सारिका गावडे, वनिता जाधव, पल्लवी रासकर आणि शोभा शिंदे यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात विविध प्रकारची झाडे लावली आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. गावातील नागरिकांनी देखील या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व सांगत पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने एक झाड लावण्याचे आवाहन केले. शाळेच्या परिसरात फळझाडे व छायादार झाडांची लागवड करण्यात आली.विद्यार्थ्यांनी झाडांची निगा राखण्यासाठी पुढील काळातही काळजी घेण्याचे आश्वासन दिले. या उपक्रमासाठी फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.डी.निंबाळकर,कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.डी. चव्हाण,कार्यक्रम अधिकारी डॉ.जे.व्ही.लेंभे, प्रा.डॉ.ए.के.अभंगराव तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा.ए.डी.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी उद्यान दूत प्रथमेश चौधरी, हर्षल काळे, जतिन मांढरे, प्रज्वल मुचंडी, कल्लाप्पा मुचंडी, पंचरत्न वाघमारे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

### गळीत हंगाम २०२५-२६ आवताडे शुगरचा रोलर पूजन संपन्न

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** चालू गळीत हंगामात पावसाने लवकर सुरुवात केल्याने उसाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात होणार असल्याने हंगाम मोठा होणार आहे त्यामुळे सर्वांनी मिळून एक दिलाने येणारा गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडा असा कार्यमंत्र आवताडे शुगरचे चेअरमन संजय आवताडे यांनी कारखान्याच्या रोलर पूजन वेळी बोलताना कारखाना प्रशासनाला दिला. आवताडे उद्योग समूह संचलित आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा.लि.नंदूर या साखर कारखान्याच्या गळीत हंगाम २०२५-२६ हंगामातील रोलर पूजन कारखान्याचे चेअरमन श्री संजय आवताडे यांच्या हस्ते संपन्न झाले.



ते बोलताना पुढे म्हणाले की पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या तीन वर्षांपासून या साखर कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून तीन गळीत हंगाम यशस्वीपणे पूर्ण केले आहेत. कोणत्याही साखर कारखान्याच्या यशस्वी वाटचालीमध्ये महत्वपूर्ण असणाऱ्या शेतकरी व ऊस उत्पादकांच्या जीवनामध्ये आर्थिक मार्गाने सुबत्ता आणण्यासाठी आम्ही सार्वजनिक प्रयत्नवादी राहणार आहे. गळीत हंगाम २०२५-२६ साठी कारखाण्याचे वाहनाचे करार पूर्ण झालेले असून पहिल्या हप्ताचे वाटप चालू झालेले असल्याबाबत माहिती देण्यात आली त्याचबरोबर मागील वर्षी जाहीर केलेल्या दरा प्रमाणे सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांची बिले ही अदा केलेली आहेत.

यंदाही आमचा कारखाना दराच्या बाबतीत पाठीमागे राहणार नसून शेतकऱ्यांचे समाधान होईल असा दर देऊन आम्ही कारखाना चालवणार असून अचूक नियोजन आणि उत्कृष्ट प्रशासन यांची सांगड घालून मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी कारखाना जोमाने सुरु होईल आणि गाळप उद्दिष्ट पूर्ण करेल असा विश्वासही चेअरमन संजय आवताडे यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, मारापूरचे सरपंच विनायक यादव, दामाजी कारखान्याचे माजी संचालक विजय माने, भारत निकम, जनरल मॅनेजर सुधीर पाटील, वर्क्स मॅनेजर धैर्यशील जाधव, चिफ केमिस्ट सुनील पाटील, एच आर मॅनेजर ज्ञानेश्वर बळवंतराव, डिस्टिलरी मॅनेजर संभाजी फाळके, परचेस व सेल मॅनेजर मोहन पवार, चिफ अकौंटंट बजरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, उपशेती अधिकारी तोहीद शेख, ऊस पुरवठा अधिकारी दामोदर रेवे, आयटी मॅनेजर निलेश रणदिवे, इलेक्ट्रिक मॅनेजर संजय शिंदे, सहा.सुरक्षा अधिकारी रणजीत पवार, अशोक आसबे, अधिकार व कर्मचारी उपस्थित होते.